सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६०

# मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, ~~१९५०~~

(दिनांक २१ मार्च १९८४ पर्यंत सुधारलेला)

**Bombay Act No. LX of 1950**

# The Bombay Paragana and Kulkarni Watans (Abolition) Act, ~~1950~~

*(As modified upto the 21st March 1984)*

*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४, यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[किंमत : रु. ७-००]

# THE BOMBAY PARAGANA AND KULKARNI WATANS (ABOLITION) ACT, 1950.

[Bom. LX of 1950]

## मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५०

अनुक्रमणिका

प्रस्तावना.


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त नाव, व्याप्ति व प्रारंभ ... ... ... ... | २ |
| २ | व्याख्या ... ... ... ... ... | २ |
| ३ | विवक्षित वतने ही, पदावरील हक्क व आनुषंगिक गोष्टी यांसह नाहीशी करणे ... | ३ |
| ४ | वतन जमीनधारक हा भोगवटादार असणे ... ... | ३ |
| ४-अ | वतन गावातील सर्व सार्वजनिक रस्ते वगैरे राज्य सरकारकडे निहित होणे आणि ते वतनदारास परत न देणे | ४ |
| ५ | वारसा हक्कासंबंधीचा विशेष नियम निरर्थक होणे ... ... | ५ |
| ६ | नक्त नेमणुकीच्या किंवा जमीन महसुलाच्या ऐवजी नुकसानभरपाई देणे ... | ५ |
| ७ | प्रतिनिधी वतनदारास नुकसानभरपाई देणे ... ... ... | ६ |
| ८ | मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ लागू करणे ... | ७ |
| ९ | जमिनीतील इतर हक्क नाहीसे केल्याबद्दल वगैरे नुकसानभरपाई देण्याची रीत ... | ७ |
| १० | न्यायालय शुल्क ... ... ... ... ... | ९ |
| ११ | जिल्हाधिकाऱ्याचा निवाडा व महसूल न्यायाधिकरणाचा निर्णय हे अंतिम असणे | १० |
| ११-अ | सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९३ च्या प्रारंभापूर्वी केलेल्या निवाड्यांच्या संबंधात पुनरीक्षणाचे अधिकार. | १० |
| १२ | चौकशी व कामे ही न्यायासंबंधी कामे असणे ... ... | १० |
| १३ | नियम ... ... ... ... ... | १० |
| १४ | विवक्षित कायदे लागू होण्याचे बंद होणे व विवक्षित कायद्यात सुधारणा करणे ... | १० |
| अनुसूची १ | ... ... ... ... ... | ११ |
| अनुसूची २ | ... ... ... ... ... | १२ |


मुच ४७८७-१

## सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६०.[१]

[ मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५०. ]

[ २५ जानेवारी १९५१ ]

ह्या नियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९५२ चा मुंबई अधिनियम ३.
सन १९५३ चा मुंबई अधिनियम ३८.
सन १९५४ चा मुंबई अधिनियम २९.
सन १९५५ चा मुंबई अधिनियम ५०.*
मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.
सन १९५८ चा मुंबई अधिनियम ९३.
महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

**मुंबई राज्यातील परगणा व कुलकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी —

(१) [२][पुढील खंड (२) व (२ अ) यांत उल्लेख केलेल्या बाबतींव्यतिरिक्त] इतर वंशपरंपरागत जिल्हा (परगणा) अधिकाऱ्याच्या पदाशी आणि विवक्षित वंशपरंपरागत गाव लेखापालाच्या (कुळकर्ण्यांच्या) पदाशी संबंध असलेली सेवा बजावण्याचे बंद झाले आहे;

(२) नाशिक जिल्ह्याच्या मालेगाव तालुक्यातील निंबायत महालाच्या ज्या देशपांडे वतनाच्या बाबतीत परिवर्तित धारावंदी अजून करण्यात आलेली नाही त्या वतनाशी संबंध असलेल्या सेवेची यापुढे आवश्यकता नाही;

[३][(२–अ) पश्चिम खानदेश जिल्ह्याच्या नवापूर तालुक्यातील बोरपाडा गावच्या देशमुख वतनाशी संबंध असलेल्या सेवेची यापुढे आवश्यकता नाही.]

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता सन १९५० चे मुंबई सरकारचे राजपत्र (इंग्रजी) भाग ५, पृष्ठे २६३, २६४ पहा.

[२] "(२) मध्ये उल्लेख केलेली एक बाब" या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०, कलम २ (१) अन्वये दाखल करण्यात आला.

* सन १९५५ चा मुंबई अधिनियम ५० याचे कलम पुढीलप्रमाणे आहे :—

**उक्त अधिनियम कलमे ४ व ५ या अन्वये केलेल्या सुधारणांचा प्रभाव पूर्वलक्षी असणे.**

"८. ह्या अधिनियमाची कलमे ४ व ५ या अन्वये केलेल्या सुधारणा, ह्या अधिनियम ज्या तारखेस अंमलात आला त्या तारखेस करण्यात आल्या आहेत व या तारखेस त्या अंमलात आल्या आहेत असे समजले पाहिजे आणि अशा तारखेस त्या करण्यात आल्या व अंमलात आल्या आहेत असे नेहमीच समजले पाहिजे. हा अधिनियम पश्चिम खानदेश जिल्ह्याच्या नवापूर तालुक्यातील बोरपाडा गावांच्या देशमुख वतनाच्या बाबतीत लागू करताना तो सन १९५५ चा मुंबई अधिनियम ५०, कलम ७ अन्वये सुधारण्यात आला आहे."

[३] हा खंड सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०, कलम २ (२) अन्वये दाखल करण्यात आला.

(३) ग्राम लेखापालांच्या (कुळकर्ण्यांच्या) वंशपरंपरागत अशा बाकीच्या वतनाशी संबंध असलेली सेवा बजावण्याची यापुढे आवश्यकता नाही;

आणि ज्याअर्थी, राज्याच्या कारभाराच्या हिताच्या दृष्टीने परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करणे आणि त्या पदांपैकी काही पदांची कामे करण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे;

त्याअर्थी याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ति व प्रारंभ. १. (१) ह्या अधिनियमास, मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम १९५० असे म्हणता येईल.

(२) तो [१][विलीन प्रदेश वगळून महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रास] लागू असेल.

(३) राज्य शासन राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे याबाबत जी तारीख निर्दिष्ट करील त्या तारखेस तो अंमलात येईल.

व्याख्या. २. (१) विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काही नसल्यास, ह्या अधिनियमात —

(अ) "नियत दिवस" या शब्द प्रयोगाचा अर्थ हा अधिनियम, ज्या दिवशी अंमलात येईल तो दिवस असा समजावा,

(ब) "संहिता" म्हणजे मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९;

[२][(बब) "जिल्हाधिकारी" या संज्ञेत ह्या अधिनियमाअन्वये जिल्हाधिकाऱ्याची कामे करण्यासाठी व त्यांच्या अधिकाराचा वापर करण्यासाठी राज्य सरकारने नेमलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो)];

(क) "परिवर्तित धाराबंदी" या शब्दप्रयोगाचा अर्थ, वतन अधिनियमाच्या ज्या उपबंधांअन्वये वतनाशी संबंध असलेली सेवा बजावण्याच्या जबाबदारीतून धारक, त्याचे वारस व उत्तराधिकारी यांची मुक्तता करण्यात आली आहे त्या उपबंधांअन्वये केलेली किंवा कायम केलेली धाराबंदी असा समजावा;

(ड) "कुळकर्णी वतन" या संज्ञेचा अर्थ, ग्राम लेखापालाच्या पदाशी संबंधित असलेले वतन असा समजावा; व तीत उक्त पदाशी संबंध असलेल्या ज्या वतनाच्या बाबतीत परिवर्तित धाराबंदी करण्यात आलेली असेल त्या वतनाचा समावेश होतो;

(ई) "परगणा वतन" या संज्ञेचा अर्थ, वंशपरंपरागत जिल्हा (परगणा) अधिकाऱ्याच्या पदांशी संबंध असलेल्या ज्या वतनाच्या बाबतीत परिवर्तित धाराबंदी करण्यात आलेली असेल असे वतन असा समजावा; व तींत नाशिक जिल्ह्याच्या मालेगाव तालुक्यातील निंबायत महालाच्या देशपांडे वतनाचा [३][आणि पश्चिम खानदेश जिल्ह्याच्या नवापूर तालुक्यातील बोरपाडा गावच्या देशमुख वतनाचा समावेश होतो];

(फ) "विहित" म्हणजे ह्या अधिनियमाअन्वये केलेल्या नियमांनी विहित केलेले;

(ग) "वतन अधिनियम" म्हणजे मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियम, १८७४; १८७४ चा मुंबई ३.

(ह) "वतन जमीन" या संज्ञेचा अर्थ परगणा किंवा कुळकर्णी वतनाच्या मालमत्तेचा भाग असलेली जमीन असा समजावा;

---

[१] "दुसऱ्या राज्यात गेलेला प्रदेश, आणि विलीन प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यास" या मजकुराऐवजी हा मजकूर महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये दाखल करण्यात आला.

[२] खंड बब हा सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८, कलम ३ व अनुसूची अन्वये जादा दाखल करण्यात आला.

[३] हा मजकूर सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५० याच्या कलम ३ अन्वये दाखल करण्यात आला.

(२) ह्या अधिनियमात वापरलेल्या शब्दांचा व शब्दप्रयोगांचा अर्थ, यथास्थिति, वतन अधिनियम व संहिता यात त्यांना जो अर्थ दिलेला असेल तोच असेल---मग उक्त अधिनियमाचे किंवा संहितेचे उपबंध लागू असोत वा नसोत.

विवक्षित वतने ही पदावरील हक्क व आनुषंगिक गोष्टी यांसह नाहीशी करणे.

३. कोणताही कायदा, परिपाठ, भूमिव्यवस्थापत्र, इनामपत्र, सनद किंवा आदेश यांत काहीही असले तरी, नियत दिवशी व त्या दिवसापासून---

(१) सर्व परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्यात आली आहेत असे समजण्यात येईल.

(२) उक्त वतनाशी संबंध असलेले पद धारण करण्याविषयीचे सर्व हक्क आणि उक्त वतनाशी संबंध असलेली सेवा करण्याचे दायित्व ही या अन्वये नष्ट करण्यात आली आहेत;

(३) कलम ४ च्या उपबंधांस अधीन राहून, सर्व वतन जमीन ही बिनदुमाला जमीन आहे असे समजून याअन्वये परत घेण्यात आली आहे व ती संहिता व तदन्वये केलेले नियम यांच्या तरतुदींनुसार जमीन महसूल देण्यास पात्र असल्याचे समजण्यात येईल :

परंतु, वतन अधिनियमाचे कलम ५ याच्या तरतुदींना अनुसरून अशा वतन जमिनीचे जे कोणतेही अन्यसंक्रामण करण्यात आले असेल त्याच्या विधिग्राह्यतेस किंवा ज्यास ती अन्यसंक्रामित करून देण्यात आली असेल असा कोणताही इसम किंवा त्याच्या विद्यमाने किंवा त्याच्यामार्फत दावा सांगणारी कोणतीही व्यक्ती यांच्या हक्कांस जमीन अशा रीतीने परत घेतल्यामुळे बाध येणार नाही.

(४) उक्त वतनाशी संबंध असलेल्या सर्व आनुषंगिक गोष्टी याअन्वये नष्ट करण्यात आल्या आहेत.

वतन जमीन धारक हा भोगवटादार असणे.

४. (१) ह्या अधिनियमाच्या तरतुदींन्वये परत घेण्यात आलेली वतन जमीन ही, [1][कलम ४-अ च्या तरतुदींच्या अधीन राहून] ज्या वतनाशी तिचा संबंध असेल ते वतन धारण करणाऱ्या व्यक्तीस, अशा जमिनीच्या संपूर्ण आकारणीच्या रकमेच्या बारा पटीइतके भोगाधिकारमूल्य, हा अधिनियम अंमलात आल्याच्या तारखेपासून [2][पाच वर्षांच्या] आत देण्यात आल्यावर, परत देण्यात येईल आणि धारक हा अशा जमिनीच्या बाबतीत संहितेच्या अर्थानुसार भोगवटादार आहे असे समजण्यात येईल आणि तो संहिता व तदन्वये केलेले नियम यांच्या तरतुदींनुसार राज्य सरकारास जमीन महसूल देण्याबद्दल प्रथमतः जबाबदार असेल; संहितेचे व त्यानुसार केलेल्या नियमांचे बिनदुमाला जमिनीसंबंधीच्या सर्व तरतुदी, ह्या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, उक्त जमिनीच्या बाबतीत लागू होतील.

परंतु, स्थानापन्नाच्या वित्तलब्धीसाठी जी वतन जमीन नेमून देण्यात आली नसेल तिच्या बाबतीत अशी जमीन परत देण्याबद्दल तिच्या धारकाने अशा जमिनीच्या संपूर्ण आकारणीच्या रकमेच्या सहा पटींइतके भोगाधिकारमूल्य दिले पाहिजे :

तसेच ह्या कलमात तरतूद केल्याप्रमाणे धारकाने भोगाधिकार मूल्य [2][पाच वर्षांच्या] मुदतीत देण्यात कसूर केली तर, तो अशी जमीन अनधिकृतपणे धारण करीत आहे असे समजण्यात येईल आणि तो, संहितेच्या तरतुदींनुसार संक्षिप्तपणे काम चालवून अशा जमिनीतून हुसकावून लावला जाण्यास पात्र होईल.

---

१ हा मजकूर सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५० याच्या कलम ४ अन्वये जादा दाखल करण्यात आला.

२ "तीन वर्षांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम २ अन्वये दाखल करण्यात आला.

(२) पोट-कलम (१) अन्वये परत दिलेल्या जमिनीचा भोगवटा हा जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वमंजुरी-वाचून आणि राज्य शासन सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे निश्चित करील अशी रक्कम दिल्यावाचून हस्तांतरित करता येणार नाही किंवा मोजमाप करून विभागता येणार नाही.

(३) [1][पोट-कलमे (१) व (२)] यातील कोणतीही तरतूद पुढील कोणत्याही जमिनीच्या बाबतीत लागू होणार नाही :–

(अ) वतनाशी संबंध असलेली जमीन ही राज्य शासनाच्या मंजुरीवाचून अन्यसंक्रामित करता येईल अशी स्पष्ट तरतूद ज्या जमिनीसंबंधीच्या परिवर्तित धाराबंदीनुसार करण्यात आली आहे अशी कोणतीही जमीन; अथवा

(ब) वतन अधिनियमाचे कलम ५ अन्वये राज्य शासनाच्या मंजुरीने जी विधिग्राह्यरीत्या अन्य-संक्रामित करण्यात आली आहे अशी कोणतीही जमीन.

**स्पष्टीकरण.**—ह्या कलमाच्या प्रयोजनांकरिता "धारक" या संज्ञेत पुढील व्यक्तींचा समावेश होतो:–

(१) ज्या वतनाशी जमिनीचा संबंध असेल त्या एकाच वतनाच्या ज्या व्यक्ती नेमलेल्या दिवशी वतनदार असतील अशा सर्व व्यक्ती; आणि

(२) ज्या वतनाच्या संबंधाने परिवर्तित धाराबंदी करण्यात आली आहे व अशा धाराबंदीनुसार अशा ज्या वतनाशी संबंध असलेली जमीन हस्तांतरित करण्याची परवानगी देण्यात आली आहे त्या वतनांच्या बाबतीत, अशा जमिनीची मालकी त्या त्या वेळी ज्या व्यक्तीकडे असेल अशी कोणतीही व्यक्ती.

वतन गावातील सर्व सार्वजनिक रस्ते वगैरे [रा]ज्य सरकारकडे निहित [हो]णे आणि ते वतनदारास परत न देणे.

[2][४–अ शंकेचे निरसन व्हावे म्हणून या अन्वये असे जाहीर करण्यात येते की, हा अधिनियम अंमलात येण्याच्या निकटपूर्वी, कुळकर्णी किंवा परगणा वतन म्हणून धारण केलेल्या गावांच्या किंवा जमिनीच्या हद्दीत असलेले सर्व सार्वजनिक रस्ते, गल्ल्या व मार्ग व त्यावरील किंवा त्यांजवळील, सर्व पूल, चर, बांध व कुंपणे आणि भरतीच्या पाण्याच्या खुणेच्या खालील समुद्राचा, बंदरांचा व खाड्यांचा आणि नद्यांचा, ओढ्यांचा, नाल्यांचा, तलावांचा, विहिरींचा व तळ्यांचा तळ, आणि सर्व कालवे व पाण्याचे पाट व सर्व साचलेले व वाहते पाणी, ज्यावर बांधकाम करण्यात आलेले नाही अशा सर्व गावठाणातील सर्व जमिनी ह्या सर्व गोष्टी त्यांत किंवा त्यावर वतन धारण करणाऱ्या व्यक्तीव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीचे हक्क जेथवर प्रस्थापित होतील तेथवर ती बाब खेरीजकरून आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये अन्यथा जी तरतूद करण्यात येईल त्या व्यतिरिक्त, त्यांतील किंवा त्यावरील किंवा त्यांच्या संबंधातील, सर्व हक्कांसह, राज्य सरकारकडे निहित होतील व त्या सर्व गोष्टी वर सांगितल्याप्रमाणे राज्य सरकारची मालमत्ता असल्याचे समजले जाईल; आणि वतन धारण करणाऱ्या व्यक्तीने अशा मालमत्तेत धारण केलेले सर्व हक्क नष्ट झाले आहेत असे समजण्यात येईल. राज्य शासनाच्या सामान्य किंवा विशेष आदेशास अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्यास त्यांचा विनियोग त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे करता येईल. व त्याने तसे करणे हे कायदेशीर असेल. मात्र त्याबाबतीत वतन धारण करणाऱ्या व्यक्ती व्यतिरिक्त वैधरीत्या असलेले इतर लोकांचे किंवा व्यक्तींचे जाण्यायेण्याचे हक्क व इतर हक्क हे नेहमीच सुरक्षित राहतील].

---

[1] "पोट-कलम (२)" या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम ३ व अनुसूचीअन्वये दाखल करण्यात आला.

[2] हे कलम सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५० याच्या कलम ५ अन्वये जादा दाखल करण्यात आले.

५. कोणत्याही वतन जमिनीच्या वारसाहक्कासंबंधीच्या कोणत्याही कायद्यातील ज्या कोणत्याही तरतुदींवरून, परिपाठावरून, किंवा प्रघातावरून, पक्षकारांना लागू असलेल्या व्यक्तिगत विधीच्या विरुद्ध अग्रजाधिकारासंबंधी नियम पाळण्यात येत असेल आणि पुरुष वारसास पसंती देऊन स्त्रीवारसास मागे टाकण्यात येत असेल अशी कोणतीही तरतूद, परिपाठ किंवा प्रघात नेमलेल्या दिवशी व त्या दिवसापासून निरर्थक होईल आणि ती अंमलात असण्याचे बंद होईल. वारसाहक्कासंबंधीचा विशेष नियम निरर्थक होणे.

*६. कोणताही विधी, परिपाठ, धाराबंदीपत्र, अनुदानपत्र, सनद किंवा आदेश यांत काहीही असले तरी— [1][नक्त नेमणुकीच्या किंवा जमीन-महसुलाच्या ऐवजी नुकसान-भरपाई देणे.]

(१) ज्या वतनाच्या बाबतीत परिवर्तित धाराबंदी करण्यात आलेली आहे ते वतन धारण करणाऱ्या व्यक्तीस नियत दिवशी येणे असलेल्या नक्त नेमणुकीच्या रकमेच्या सात पटींइतकी रक्कम [अशा धारकास] देण्यात येईल;

(२) ज्या कोणत्याही जमिनीच्या किंवा गावाच्या संबंधातील वतन मालमत्ता ही अशा जमिनीच्या किंवा गावाच्या सबंध जमीन महसुलाची मिळून किंवा त्याच्या भागाची मिळून बनली असेल अशा जमिनीच्या किंवा गावाच्या बाबतीत [2][अशा जमीन महसुलाच्या दहापटीइतकी रक्कम, धारकास

---

[1] मूळ समासटीपेऐवजी ही समासटीप सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम ३ व अनुसूचीअन्वये दाखल करण्यात आली.

[2] "अशा जमीन महसुलाच्या रकमेइतकी रक्कम" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व सदरहू दहा वर्षांची मुदत संपेपर्यंत दरसाल देण्यात येईल" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम ३ व दुसऱ्या अनुसूचीअन्वये दाखल करण्यात आला.

* सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४० याचे कलम ३ पुढीलप्रमाणे आहे :—

३. (१) जमिनीचे सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमात कोणताही मजकूर असला तरीही, कोणत्याही इसमाचे मिळकतीतील हक्क किंवा हितसंबंध रद्द करणे, नष्ट करणे किंवा त्यांत फेरफार करणे याबद्दल पहिल्या अनुसूचीच्या स्तंभ १ मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिनियमांचे त्याच्या २ ऱ्या स्तंभात निर्दिष्ट केलेल्या उपबंधांन्वये राज्य सरकारने अशा इसमास नुकसानभरपाई म्हणून दिलेली किंवा इतर रीतीने देण्याजोगी रक्कम ही, पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे तींतून रकमा वजा केल्या जाण्यास पात्र राहून, अशा इसमास देण्यात आली पाहिजे. नुकसान भरपाईच्या रकमेतून जमीन महसुलाच्या थकबाकीच्या रकमा वगैरे वजा करणे.

(२) अशा रकमेपैकी एक-तृतीयांश रकमेतून पुढील रकमा वजा केल्या पाहिजेत व राज्य सरकारकडे जमा केल्या पाहिजेत :—

(अ) अशा मिळकतीच्या संबंधातील जमीनमहसुलातील थकबाकी, उपकर व इतर देणी यांच्या संबंधित तारखेपूर्वीच्या कोणत्याही मुदतीकरिता अशा इसमाकडून येणे असल्याविषयी जिल्हाधिकाऱ्याने दाखला दिलेल्या रकमा;

(ब) संबंधित तारखेस फेड करण्यायोग्य झाल्याचा जिल्हाधिकाऱ्याने दाखला दिला असेल अशी राज्य सरकारने दिलेल्या कोणत्याही कर्जाची सबंध रक्कम किंवा तिचा भाग, त्यांवरील व्याजासह, काही असल्यास; आणि

(क) अशा इसमास लागू असलेल्या जमिनीचा सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत अधिनियमांच्या संबंधित उपबंधाअन्वये अशा इसमाने राज्य सरकारला देण्याजोगी भोगवट्याच्या किंमतीची रक्कम, तशी असल्यास,

(३) मागील पोट-कलमांचे उपबंध हे, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणताही कायद्याच्या ज्या उपबंधांअन्वये वजा करावयाची रक्कम वसूल करण्याजोगी असेल त्या उपबंधांव्यतिरिक्त असतील व त्यांवरून (त्या कायद्याच्या) उपबंधांचे महत्त्व कमी होणार नाही.

देण्यात येईल आणि जर असा धारक अशी रक्कम देण्यापूर्वी मरण पावला तर ती त्याच्या वारसास किंवा वारसांस देण्यात येईल; मात्र अशा रकमेतून नियत दिवस आणि मुंबई भू-सत्ताप्रकार नाहीसे करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९५३, हा ज्या दिवशी अंमलात आला तो दिवस यांच्या दरम्यानच्या मुदतीत यथास्थिति अशा धारकास किंवा त्याच्या वारसास किंवा वारसांस जी कोणतीही नक्त नेमणुकीची रक्कम दिली असेल ती रक्कम वजा करण्यात येईल.] १९५३ चा मुंबई ३८.

स्पष्टीकरण :— ह्या कलमाच्या प्रयोजनांकरिता "धारक" या संज्ञेचा अर्थ, वतन अधिनियमाचे कलम १५, पोट-कलम (४) यांत तिला जो अर्थ दिलेला असेल तोच असेल.

प्रतिनिधी वतनदारास नुकसान-भरपाई देणे.

*[1][७ नियम दिवसाच्या निकटपूर्वी ज्याचे नाव प्रतिनिधी वतनदार म्हणून नोंदण्यात आले असेल आणि हा अधिनियम अंमलात आल्यामुळे वंशपरंपरागत ग्राम लेखापालाची कर्तव्ये बजावण्याचा हक्क ज्यास प्राप्त होण्याचे बंद झाले असेल अशा व्यक्तीच्या बाबतीत, हा अधिनियम ज्या वर्षी अंमलात आला त्या वर्षाच्या निकटपूर्वीच्या वर्षात अशी सेवा केल्याबद्दल प्रतिनिधी वतनदारास प्रतिवर्षी उपलब्धीची जी रोख रक्कम देण्याजोगी असेल तिच्या सातपटीइतकी रक्कम, अशा प्रतिनिधी वतनदारास नुकसानभरपाई म्हणून देण्यात येईल आणि असा प्रतिनिधी वतनदार अशी रक्कम त्यास देण्यापूर्वी मरण पावला तर, ती त्याच्या वारसांस किंवा वारसांस देण्यात येईल : मात्र अशा रकमेतून, नियम दिवस आणि मुंबई भूसत्ताप्रकार नाहीसे करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९५३ हा ज्या दिवशी अंमलात आला तो दिवस यांच्या दरम्यानच्या मुदतीत, यथास्थिति अशा प्रतिनिधी वतनदारास किंवा त्याच्या वारसास किंवा वारसांस नुकसानभरपाईची जी कोणतीही रक्कम मिळाली असेल ती रक्कम वजा करण्यात येईल. १९५३ चा मुंबई ३८.

---

[1] मूळ कलमाऐवजी हे कलम, सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम ३ व दुसऱ्या अनुसूचीअन्वये दाखल करण्यात आले.

* सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४० याचे कलम ३ पुढीलप्रमाणे आहे :—

नुकसान-भरपाईच्या रकमेतून जमीन महसुलाच्या थकबाकीच्या रकमा वगैरे वजा करणे.

३. (१) जमिनीचे सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमांत कोणताही मजकूर असला तरीही कोणत्याही इसमाचे मिळकतीतील हक्क किंवा हितसंबंध रद्द करणे, नष्ट करणे, किंवा त्यांत फेरफार करणे याबद्दल पहिल्या अनुसूचीच्या स्तंभ १ मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिनियमांचे त्याच्या २ ऱ्या स्तंभात निर्दिष्ट केलेल्या उपबंधान्वये राज्य सरकारने अशा इसमास नुकसानभरपाई म्हणून दिलेली किंवा इतर रीतीने देण्याजोगी रक्कम ही, पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे तीतून रकमा वजा केल्या जाण्यास पात्र राहून, अशा इसमास देण्यात आली पाहिजे.

(२) अशा रकमेपैकी एक-तृतीयांश रकमेतून पुढील रकमा वजा केल्या पाहिजेत व राज्य सरकारकडे जमा केल्या पाहिजेत :—

(अ) अशा मिळकतीच्या संबंधातील जमीनमहसुलातील थकबाकी, उपकर व इतर देणी यांच्या संबंधित तारखेपूर्वीच्या कोणत्याही मुदतीकरिता अशा इसमाकडून येणे असल्याविषयी जिल्हाधिकाऱ्याने दाखला दिलेल्या रकमा;

(ब) संबंधित तारखेस फेड करण्यायोग्य झाल्याचा जिल्हाधिकाऱ्याने दाखला दिला असेल अशी राज्य सरकारने दिलेल्या कोणत्याही कर्जाची सबंध रक्कम किंवा तिचा भाग, त्यावरील व्याजासह, काही असल्यास; आणि

(क] अशा इसमास लागू असलेल्या जमिनीचा सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत अधिनियमांच्या संबंधित उपबंधाअन्वये अशा इसमाने राज्य सरकारला देण्याजोगी भोगवट्याच्या किंमतीची रक्कम, कोणतीही असल्यास,[3]

(३) मागील पोट-कलमांचे उपबंध, हे त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या ज्या उपबंधाअन्वये वजा करावयाची रक्कम वसूल करण्याजोगी असेल त्या उपबंधांव्यतिरिक्त असतील व त्यावरून [त्या कायद्यांच्या] उपबंधांचे महत्त्व कमी होणार नाही.

स्पष्टीकरण:—ह्या कलमाच्या प्रयोजनांकरिता प्रतिनिधी वतनदाराच्या प्रतिनियुक्त व्यक्तीस किंवा त्याच्याऐवजी काम करणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीस अशी रक्कम मिळण्याचा हक्क प्राप्त होणार नाही].

मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८, लागू करणे.

८. जर कोणतीही वतन जमीन कायदेशीररीत्या पट्ट्याने देण्यात आली असेल आणि असा पट्टा, नियत दिवशी अस्तित्वात असेल तर, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८, याच्या तरतुदी उक्त पट्ट्याच्या बाबतीत लागू होतील आणि अशी जमीन धारण करणारी व्यक्ती व तिचे कूळ किंवा तिची कुळे यांच्या हक्कांचे व दायित्वांचे नियमन या अधिनियमाच्या तरतूदींच्या अधीन राहून राहतील व त्यांचे उक्त अधिनियमाच्या तरतुदींद्वारे होईल.

स्पष्टीकरण:—ह्या कलमाच्या प्रयोजनाकरिता 'जमीन' या संज्ञेचा अर्थ, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ यांत तिला जो अर्थ दिलेला असेल तोच असेल.

जमिनीतील इतर हक्क नाहीसे केल्याबद्दल वगैरे नुकसानभरपाई देण्याची रीत.

९. (१) ह्या अधिनियमाच्या तरतुदींमुळे कोणत्याही व्यक्तीचे मालमत्तेतील कोणतेही हक्क किंवा हितसंबंध नाहीसे किंवा नष्ट होऊन किंवा त्यात फेरफार होऊन त्याचे नुकसान झाले असेल आणि ते अशा रीतीने नाहीसे किंवा नष्ट केल्याबद्दल किंवा त्यात फेरफार केल्याबद्दल ह्या अधिनियमाच्या तरतुदींमध्ये नुकसान भरपाई देण्याची तरतूद करण्यात आली नसेल तर, अशा व्यक्तीस नुकसानभरपाई मिळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.

---

*सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४० याचे कलम ३ पुढीलप्रमाणे आहे :—

नुकसान भरपाईच्या रकमेतून जमीन महसुलाच्या थकबाकीच्या रकमा वगैरे वजा करणे.

३. (१) जमिनीचे सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमात कोणताही मजकूर असला तरीही कोणत्याही इसमाचे मिळकतीतील हक्क किंवा हितसंबंध रद्द करणे, नष्ट करणे किंवा त्यात फेरफार करणे याबद्दल पहिल्या अनुसूचीच्या स्तंभ १ मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिनियमाचे त्याच्या २ ऱ्या स्तंभात निर्दिष्ट केलेल्या उपबंधान्वये राज्य सरकारने अशा इसमास नुकसानभरपाई म्हणून दिलेली किंवा इतर रीतीने देण्याजोगी रक्कम ही, पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे तींतून रकमा वजा केल्या जाण्यास पात्र राहून अशा इसमास देण्यात आली पाहिजे.

(२) अशा रकमेपैकी एक-तृतीयांश रकमेतून पुढील रकमा वजा केल्या पाहिजेत व राज्य सरकारकडे जमा केल्या पाहिजेत :—

(अ) अशा मिळकतीच्या संबंधातील जमीनमहसुलातील थकबाकी, उपकर व इतर देणी यांच्या संबंधित तारखेपूर्वीच्या कोणत्याही मुदतीकरिता अशा इसमाकडून येणे असल्याविषयी जिल्हाधिकाऱ्याने दाखला दिलेल्या रकमा;

(ब) संबंधित तारखेस फेड करण्यायोग्य झाल्याचा जिल्हाधिकाऱ्याने दाखला दिला असेल अशी राज्य सरकारने दिलेल्या कोणत्याही कर्जाची संबंध रक्कम किंवा तिचा भाग, त्यांवरील व्याजासह, काही असल्यास, आणि

(क) अशा इसमास लागू असलेल्या जमिनीचा सत्ताप्रकार रद्द करण्याबाबत अधिनियमांच्या संबंधित उपबंधान्वये अशा इसमाने राज्य सरकारला देण्याजोगी भोगवट्याच्या किंमतीची रक्कम, कोणतीही असल्यास,

(३) मागील पोट-कलमांचे उपबंध, हे त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या ज्या उपबंधाअन्वये वजा करावयाची रक्कम वसूल करण्याजोगी असेल त्या उपबंधान्यतिरिक्त असतील व त्यावरून (त्या कायद्याच्या) उपबंधाचे महत्त्व कमी होणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये करावयाचा अर्ज [1][दिनांक ३० एप्रिल १९५४ रोजी किंवा त्यापूर्वी] जिल्हाधिकाऱ्याकडे विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे करण्यात येईल. [2][परंतु कलम ४-अच्या तरतुदींमुळे कोणत्याही व्यक्तीचे मालमत्तेतील हक्क किंवा हितसंबंध नाहीसे किंवा नष्ट होऊन किंवा त्यात फेरफार होऊन तिचे नुकसान झाले असेल तेव्हा, असा अर्ज, मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९५५, ज्या तारखेस अंमलात आला त्या तारखेपासून बारा महिन्याच्या आत करण्यात येईल.] जमीन महसूल अधिनियमांत तरतूद केलेल्या रीतीने रीतसर चौकशी केल्यानंतर जिल्हाधिकारी भूमि संपादन अधिनियम, १८९४ याची कलमे २३ (१) व २४ यांत तरतूद केलेल्या रीतीने नुकसानभरपाई ठरविण्यासंबंधी निवाडा करील; [3][असे करताना जिल्हाधिकाऱ्याने पुढील शर्ती पाळल्या पाहिजेत :—

(१) संबंधित मालमत्ता ही जर जमीन असेल आणि अशा जमिनीसंबंधाने लोक जाण्येण्याचा हक्क उपभोगीत असतील किंवा असा हक्क त्यांनी मिळविला असेल किंवा तिच्यावर कोणत्याही व्यक्तीचा वहिवाटीचा कोणताही हक्क असेल तर, नुकसानभरपाईची रक्कम ही संहितेअन्वये केलेल्या नियमास अनुसरून, लागवडीस न आणलेल्या जमिनीच्या बाबतीत उक्त गावात वार्षिक आकारणीची जी रक्कम वसूल करण्याजोगी असेल त्यापेक्षा अधिक असता कामा नये; किंवा अशा नियमात आकारणीची अशी रक्कम वसूल करण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यात आली नसेल तर, नुकसान-भरपाईची रक्कम ही, दावा सांगणाऱ्या इसमाने धारण केलेल्या हक्काची किंवा हितसंबंधाची बाजार किंमत म्हणून जिल्हाधिकाऱ्याच्या मते जी रक्कम असेल त्या रकमेइतकी राहील].

(२) जमिनीवर कोणतीही झाडे किंवा कोणतीही बांधकामे असतील तर, नुकसानभरपाईची रक्कम ही, यथास्थिती अशा झाडांची किंवा बांधकामांची बाजार किंमत म्हणून जी रक्कम असेल त्या रकमेइतकी राहील].

[4][२अ] (एक) जेव्हा पोट-कलम (२) अन्वये निवाडा करणारा अधिकारी ह्या अधिनियमान्वयेचा जिल्हाधिकारी असेल परंतु संहितेच्या ८ व्या कलमान्वये नेमलेला जिल्हाधिकारी नसेल आणि अशा निवाड्याची रक्कम पांच हजार रुपयांहून अधिक असेल तेव्हा, उक्त निवाडा—

(अ) निवाड्याची रक्कम पंचवीस हजार रुपयांहून अधिक नसेल तर संहितेच्या ८ व्या कलमान्वये नेमलेल्या जिल्हाधिकाऱ्याच्या आगाऊ संमतीवाचून, किंवा

(ब) निवाड्याची रक्कम पंचवीस हजार रुपयांहून अधिक असेल परंतु एक लाख रुपयांहून अधिक नसेल तर आयुक्ताच्या आगाऊ संमतीवाचून, किंवा

(क) निवाड्याची रक्कम एक लाख रुपयांहून अधिक असेल तर राज्य सरकारच्या, आगाऊ संमतीवाचून

करता कामा नये.

---

[1] "तारीख ३१ माहे मार्च सन १९५२ रोजी व तत्पूर्वी" या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम ३ व दुसऱ्या अनुसूचीअन्वये दाखल करण्यात आला.

[2] हा मजकूर सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५० याच्या कलम ६ (१) अन्वये जादा दाखल करण्यात आला.

[3] हा मजकूर सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५० याच्या कलम ६ (२) अन्वये जादा दाखल करण्यात आला.

[4] पोट-कलम (२-अ) हे सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९३ याच्या कलम २ व अनुसूची अन्वये दाखल करण्यात आले.

(दोन) जेव्हा पोट–कलम (२) अन्वये निवाडा करणारा अधिकारी हा, या अधिनियमान्वयेचा जिल्हाधिकारी असेल आणि त्याचप्रमाणे तो संहितेच्या कलम ८ अन्वये नेमलेला जिल्हाधिकारीही असेल आणि अशा निवाड्याची रक्कम पंचवीस हजार रुपयांहून अधिक असेल तेव्हा असा निवाडा–

(अ) निवाड्याची रक्कम एक लाख रुपयांहून अधिक नसेल तर, आयुक्ताच्या, आगाऊ संमतीवाचून किंवा

(ब) निवाड्याची रक्कम एक लाख रुपयांहून अधिक असेल तर, राज्य सरकारच्या, आगाऊ संमतीवाचून

करता कामा नये.

(तीन) पोट-कलम (२) अन्वयेचा प्रत्येक निवाडा भूमि-संपादन अधिनियम, १८९४ च्या कलम २६ मध्ये विहित केलेल्या नमुन्यात असेल.]

(३) जमीन महसूल देण्याच्या बाबतीत सर्वस्वी किंवा अंशतः सूट देण्यात आलेली कोणतीही वतन जमीन ही ह्या अधिनियमाच्या उपबंधांअन्वये संहितेच्या उपबंधानुसार संपूर्ण आकारणी देण्यास पात्र ठरविण्यात आलेली आहे या मुद्यावर कोणत्याही व्यक्तीस नुकसानभरपाई मागण्याचा हक्क ह्या कलमातील कोणत्याही तरतुदींमुळे प्राप्त होणार नाही.

(४) पोट-कलम (२) अन्वये जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या निवाड्यामुळे पीडित अशा कोणत्याही व्यक्तीस [1][मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९५७, अन्वये रचना करण्यात आलेल्या महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे] निवाड्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत अपील करता येईल.

(५) पोट-कलम (४) अन्वये अपिलांचा निर्णय करताना, [2][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणास] दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये मूळ न्यायालयाने दिलेल्या हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर केलेल्या अपिलांचा निर्णय करताना न्यायालयास जे अधिकार असतात ते सर्व अधिकार असतील व न्यायालय जी कार्यरीति अनुसरते तीच कार्यरीति ते अनुसरील.

(६) अपील दाखल करण्याची मुदत मोजताना, भारतीय मुदत अधिनियम, १९०८, कलमे ४, ५, १२ व १४ यांच्या तरतूदी ह्या कलमाअन्वये केलेल्या अपिलांच्या बाबतीत लागू होतील.

१०. न्यायालय शुल्क अधिनियम, १८७०, यात काहीही असले तरी, ह्या अधिनियमा- न्यायालय अन्वये [2][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे] केलेल्या प्रत्येक अपिलावर विहित करण्यात येईल शुल्क. अशा किंमतीचा न्यायालय शुल्क मुद्रांक लावण्यात येईल.

---

[1] "मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९३९ अन्वये रचना करण्यात आलेल्या मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडे" या मजकुराऐवजी हा मजकूर, महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये दाखल करण्यात आला.

[2] "मुंबई महसूल न्यायाधिकरणास" या मजकुराऐवजी हा मजकूर, महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये दाखल करण्यात आला.

जिल्हाधिकाऱ्याचा निवाडा व महसूलन्यायाधिकरणाचा निर्णय हे अंतिम असणे.

११. मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडे करण्यात आलेल्या अपिलास अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याने दिलेला निवाडा आणि [1][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने] अपिलावर दिलेला निर्णय हे अंतिम व निर्णायक असतील व त्यावर कोणत्याही न्यायालयातील कोणताही दाव्यात किंवा कामकाजात आक्षेप घेता येणार नाही.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९३ च्या प्रारंभापूर्वी केलेल्या निवाड्याच्या संबंधात पुनरीक्षणाचे अधिकार.

[2][११-अ. जेव्हा मुंबई भू-सत्ताप्रकार नाहीसे करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९५८ याच्या प्रारंभापूर्वी कलम ९, पोट-कलम (२) अन्वये कोणताही निवाडा करण्यात आला असेल आणि कलम ९, पोट-कलम ४ अन्वये अशा निवाड्याविरुद्ध कोणतेही अपील दाखल करण्यात आले नसेल तेव्हा, कलम ११ यात काहीही असले तरी राज्य शासनास, अशा निवाड्यासंबंधीच्या चौकशीची किंवा कामकाजाची वैधता, सयुक्तिकता किंवा नियमबद्धता याविषयी स्वतःची खात्री करून घेण्याकरिता अशा चौकशीचे किंवा कामकाजाचे दप्तर मागविण्याचा अधिकार आहे. हितसंबंधित पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची संधि दिल्यानंतर जर अशा चौकशीच्या किंवा कामकाजाच्या कायदेशीरपणाविषयी, सयुक्तिकतेविषयी किंवा नियमबद्धतेविषयी त्याची खात्री झाली नाही, तर त्यास निवाडा रद्द ठरविण्यात आणि नव्याने निवाडा करण्याविषयी जिल्हाधिकाऱ्यास निदेश देता येईल आणि त्यानंतर निवाडा करण्यासंबंधीचे, अशा निवाड्याच्या निर्णायकत्वासंबंधीचे आणि अशा निवाड्याविरुद्ध करावयाच्या अपिलासंबंधीचे या अधिनियमाच्या सर्व तरतुदी योग्य त्या फेरफारांनिशी अशा नवीन निवाड्यास लागू होतील].

चौकशी व कामे ही न्यायसंबंधी कामे असणे.

१२. जिल्हाधिकारी व [3][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण] याजपुढे ह्या अधिनियमान्वये चालू असलेली चौकशीची सर्व कामे व इतर सर्व कामे ही भारतीय दंड संहिता कलमे १९३, २१९ व २२८ यांच्या अर्थानुसार न्यायसंबंधी कामे आहेत असे समजण्यात येईल.

नियम.

१३. राज्य शासनास, आगाऊ प्रसिद्ध करण्याच्या शर्तीस अधीन, राहून ह्या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याकरिता नियम करता येतील. असे नियम अंतिम रीत्या करण्यात आल्यावर राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील.

विवक्षित कायदे लागू होण्याचे बंद होणे व विवक्षित कायद्यांत सुधारणा करणे.

१४. (१) अनुसूचि १ मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिनियमांच्या तरतूदी परगणा व कुळकर्णी वतनांच्या बाबतीत लागू होण्याचे बंद होईल.

(२) अनुसूची २ मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिनियमाच्या तरतुदींमध्ये उक्त अनुसूचीच्या चवथ्या स्तंभात निर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत सुधारणा करण्यात येईल—

---

[1] "मुंबई महसूल न्यायाधिकरणाने" या मजकुराऐवजी हा मजकूर, महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये दाखल करण्यात आला.

[2] कलम ११-अ हे सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९३ याच्या कलम २ व अनुसूची अन्वये दाखल करण्यात आले.

[3] "मुंबई महसूल न्यायाधिकरण" या मजकुराऐवजी हे शब्द, महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याअन्वये दाखल करण्यात आले.

(३) पोट-कलमे (१) व (२) यातील कोणत्याही तरतुदीमुळे पुढील गोष्टींवर परिणाम होत असल्याचे समजण्यात येणार नाही :—

(अ) हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी आधीच प्राप्त झालेले कोणतेही दायित्व किंवा जबाबदारी;

(ब) अशा दायित्वाच्या किंवा जबाबदारीच्या संबंधातील कोणतेही कामकाज ;

(क) उपरिनिर्दिष्ट तारखेस कोणत्याही न्यायालयात असे कामकाज चालू असताना केलेले कोणतेही कृत्य; आणि असे कोणतेही कामकाज हे, जणू हा अधिनियम संमत झाला नव्हता असे समजून, पुढे चालू ठेवता येईल.

## अनुसूची १

**परगणा व कुळकर्णी वतनांच्या बाबतीत जे अधिनियम लागू होण्याचे बंद होईल ते अधिनियम.**

(कलम १४)

| वर्ष | क्रमांक | संक्षिप्त नाव | ज्या मर्यादेपर्यंत असा अधिनियम लागू होण्याचे बंद होईल ती मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १८५२ | ११ | मुंबईचा जमीन महसूल माफ असलेल्या इस्टेटीबाबत अधिनियम, १८५२. | सबंध अधिनियम लागू होण्याचे बंद होईल. |
| १८६३ | २ | जमीन महसूल सूट (क्रमांक १) अधिनियम, १८६३. | वरीलप्रमाणे |
| १८६३ | ७ | जमीन महसूल सूट (क्रमांक २) अधिनियम, १८६३. | वरीलप्रमाणे |
| १८७४ | ३ | मुंबई वंशपरंपरागत पद अधिनियम, १८७४. | वरीलप्रमाणे |
| १८८६ | ५ | मुंबई वंशपरंपरागत पद (सुधारणा) अधिनियम, १८८६. | वरीलप्रमाणे |

## अनुसूची २

### सुधारणा केलेला अधिनियम

(कलम १४)

| १ | वर्ष २ | क्रमांक ३ | संक्षिप्त नाव ४ | सुधारणेची व्याप्ती ५ |
|---|---|---|---|---|
| ग्राम लेखापाल व वृत्तिधारी पाटील यांची नेमणूक | १८७९ | ५ | मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९. | (१) कलम १६ च्या ऐवजी पुढील कलम दाखल करावे :— ''१६. एखाद्या गावासाठी किंवा गावांच्या एखाद्या गटासाठी राज्य शासनास ग्राम लेखापाल नेमता येईल व त्याने तसे करणे हे विधिसंमत असेल. ज्या गावात वंशपरंपरागत पाटील नसतील त्या गावात राज्य शासनास वृत्तिधारी पाटील नेमता येईल व त्याने तसे करणे हे विधिसंमत असेल ग्राम लेखापाल व पाटील हे वंशपरंपरागत पाटील याची कर्तव्ये धरून ह्या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर विधिअन्वये यात यापुढे विहित केलेली सर्व कर्तव्ये बजावतील आणि दुय्यम महसूल अधिकाऱ्यांसंबंधी अंमलात असलेल्या नियमान्वये ते आपले पद धारण करतील. कोणत्याही दुमाला गावातील किंवा इतर गावातील पाटील व ग्राम लेखापाल यांच्या नेमणुकीच्या बाबतीत दुमाला गाव धारण करणारे इसम किंवा इतर धारक यांच्या कोणत्याही विद्यमान हक्कास ह्या कलमातील कोणत्याही उपबंधामुळे बाध येतो असे समजण्यात येणार नाही.<br>(२) कलमे ५८, ८५ व ९४-अ यात "वंशपरंपरागत ग्राम लेखापाल" किंवा "वंशपरंपरागत लेखापाल" हे शब्द ज्या ज्या ठिकाणी येतील त्या त्या ठिकाणी त्याच्या ऐवजी यथास्थिती "ग्राम लेखापाल" किंवा "लेखापाल" हा शब्द दाखल करावा. |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई